तरुण भारत संवाद • शुक्रवार, १७ मे २०२४

17/05/24

# विवेकानंदमध्ये आपत्ती व्यवस्थापन विषयावर कार्यशाळा

कोल्हापूर

नवीन शैक्षणिक धोरणानुसार विवेकानंद महाविद्यालयात पदवी अभ्यासक्रमात प्रथम वर्षात आपत्ती व्यवस्थापन क्रेडिट कोर्स अंतर्गत विषय सुरू केला आहे. आपत्तीच्या काळात व्यवस्थापनाचे धडे देण्याकरिता आईक्यूएसी आणि व्हाईट आर्मी यांची नियुक्ती केली आहे. आपत्ती व्यवस्थापन विषयावरील कार्यशाळेचे उ‌द्घाटन अॅस्टर आधार हॉस्पिटलचे डॉ अमोल कोडोलीकर, डॉ. भींगार्डे यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यशाळेत आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांची घ्यावयाची काळजी यासंदर्भातील प्रात्यक्षिके सादर केली. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी मनोगत व्यक्त केले. भूल तज्ज्ञ असोसिएशनच्या अध्यक्षा डॉ संगीता पाटील, डॉ. योगेश गवळी, व्हाईट आर्मीचे संस्थापक अशोक रोकडे, डॉ श्रुती जोशी, डॉ सिद्धार्थ कट्टीमनी, कॅप्टन सुनीता भोसले, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा, प्रबंधक आर. बी. जोग आदी उपस्थित होते.

17-5-24

# 'विवेकानंद'मध्ये आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयात व्हाईट आर्मीच्या वतीने झालेल्या आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेस प्रतिसाद मिळाला. कार्यशाळेत आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांची हाताळणी व घ्यावयाची काळजी याबाबत विद्यार्थ्यांकडून प्रात्यक्षिके करून घेण्यात आली. कार्यशाळेचे उद्‌घाटन ॲस्टर आधारचे डॉ. अमोल कोडोलीकर यांच्या हस्ते झाले. नवीन शैक्षणिक धोरणातील गतिमानता महाविद्यालयात आणणारी पारंपरिक शिक्षण व्यवस्थेतील ही पहिली संस्था आहे, असे मत प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी अध्यक्षीय मनोगतात व्यक्त केले. यावेळी कोल्हापूर जिल्हा भूलतज्ज्ञ असोसिएशनच्या अध्यक्षा डॉ. संगीता पाटील, डॉ. योगेश गवळी उपस्थित होते. आयोजन व्हाईट आर्मीचे संस्थापक अशोक रोकडे, आयक्यूएसीप्रमुख डॉ. श्रुती जोशी, समन्वयक डॉ. सिद्धार्थ कट्टीमनी, एनसीसी विभागप्रमुख कॅप्टन सुनीता भोसले, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा, प्रबंधक आर. बी. जोग यांनी केले.